**आगाऊ प्रत**

**महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा वर्ग-एक आणि वर्ग-२ यांमधील नियुक्ती संबंधी कार्यपध्दती व नियम**

महाराष्ट्र शासन
पाटबंधारे आणि वीज विभाग
निर्णय क्रमांक जएबी-१०७०-ई(एक)
सचिवालय, मुंबई क्र.३२ बी.आर
दिनांक १९ डिसेंबर, १९७०

**पहा:-** १. शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.७७०८/२७, दिनांक २२ मार्च १९३७
२. शासकीय अधिसूचना, राज नैतिक आणि सेवा विभाग (सर्वाजनिक बांधकामे) क्र.७७०८/२७ दिनांक २१ सप्टेंबर १९३९.
३. शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.७७०८/२७, दिनांक १२ जुलै १९४०
४. शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. जीएबी-१०५९/ई-(एक),दि.२९ एप्रिल १९६०
५. शासन निर्णय, पाटबंधरे आणि वीज विभाग क्र.जीएबी-१०६१/७४७७५-ई(एक), दिनांक २४ फेब्रुवारी १९६२.
६. शासन निर्णय, पाटबंधरे आणि वीज विभाग क्र. पीओजी/११५९/१८०८९-ई (एक), दिनांक १० सप्टेंबर १९६४
७. शासन निर्णय,पाटबंधरे आणि वीज विभाग क्र.जीएबी-१०६१/९७३१/-इ(एक), दि.२७ मे, १९६५
८. शासन निर्णय, पाटबंधरे आणि वीज विभाग क्र.एसएलएस-११६०/२५०७-इ (सी), दिनांक २६ ऑगस्ट १९६५
९. शासन निर्णय, पाटबंधरे आणि वीज विभाग क्र. जीएबी-१३६४/९३६८२-इ(एक), दिनांक २६ नोव्हेंबर १९६५
१०. शासन निर्णय, पाटबंधरे आणि वीज विभाग क्र. बीसीएस-१३६४/८६४६०-ई (एक), दिनांक २८ डिसेंबर १९६५
११. शासन निर्णय, पाटबंधरे आणि वीज विभाग क्र. जीएबी-१०६८/इ (एक),दिनांक १८ मे, १९६८
१२. शासन निर्णय, पाटबंधरे आणि वीज विभाग क्र. बीसीएस-१३६८/१२२६४८-ई (एक) दिनांक १९ फेब्रुवारी १९६९.
१३. शासन निर्णय,पाटबंधरे आणि वीज विभाग क्र.जीएबी-१०७०-(आय)इ(एक),दि.६ जुलै,१९७०.
१४. शासन निर्णय, पाटबंधरे आणि वीज विभाग क्र. जीएबी-१०७०/इ(एक) दि.१९ ऑगस्ट १९७०
१५. शासन निर्णय, इमारती व इळणवळण विभाग क्र. सीडीएस-११७०-एम, दि. ३ नोव्हेंबर १९७०
१६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे गोपनीय पत्र क्र. ७३(ए)(सहा)/५६८५-सी, दिनांक १० नोव्हेंबर १९७०

**निर्णय :-**

गेल्या दहा वर्षात असे अनुभवास आले आहे की, वर्ग-एक आणि वर्ग-दोन च्या थेट भरतीसाठी आवश्यक तितके उमेदवार मिळू शकत नाहीत आणि सरळसेवा प्रविष्ट व पदोन्नत उमेदवारांकरीता निश्चित करण्यात आले त्या प्रमाणामुळे कनिष्ठ प्रवर्गाच्या व दुय्यम सेवा मधील अभियंत्याना त्रास सहन करावा लगत असे.

स्थायी रिक्त पदे उपलब्ध असूनही तात्पुरती बढती मिळालेल्या वर्ग-एक व वर्ग-दोन च्या बहुसंख्य अधिकाऱ्यांना कायम करता येत नव्हते त्यामुळे ज्येष्ठताक्रमा, स्थायीकरण आणि पदोन्नती या बाबतीत सरळ सेवा प्रविष्ठ व पदोन्नत यांच्यात आणि पदोन्नत मध्ये पदवीधर व पदवीकाधारक यांच्यात संघर्ष निर्माण झाले म्हणून, १९६० चा शासन निर्णय काही काळ शासनाने पुनर्विलोकनासाठी विचाराधीन ठेवला होता. मागील काही वर्षात अनुभवलेल्या अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने सरळ सेवा प्रविष्ट आणि पदोन्नत यांच्यासाठी समव्यापी तत्वावर प्रमाण निश्चित करण्यासाठी, जनसेवा प्रविष्ठा प्रमाणेच दुय्यम अभियांत्रिकी सेवेतील सर्व स्नातक आणि स्नातकेतर उमेदवारांना प्रोत्साहन देण्यासाठी, आणि त्यामुळे संपूर्ण अभियांत्रिकी सेवेत निश्चितपणे कार्यक्षमता आणण्यासाठी शासन पुढील नियम करीत आहे.

**(एक) नियमांची अंमलबजावणी, ते रद्द करणे आणि लागू करणे.**

१) हे नियम २१ डिसेंबर १९७० पासून अंमलात येतील.

२) शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. जीएबी-१०५९-इ (एक), दिनांक २९ एप्रिल, १९६० आणि या आधी काढलेले इतर सर्व आदेश, या नियमांना ते बाधक असतील तेथवर निष्प्रभावी करण्यात आल्याचे किंवा सुधारण्यात आल्याचे समजण्यात येईल.

३) पाटबंधारे आणि वीज विभाग आणि इमारती व दळणवळण विभाग या दोन्ही विभागांमधील महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवेच्या प्रवर्गांन हे नियम लागू होतील तसेच ते महाराष्ट्र अभियांत्रिकी सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी सेवा वर्ग-एक आणि वर्ग-दोन यांना देखील लागू होती.

४) तथापि, हे नियम अधीक्षक अभियंते आणि मुख्य अभियंते या पदांवरील पदोन्नतीसाठी किंवा स्थायीकरणसाठी लागू करण्यात येणार नाहीत.

**(दोन) महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा वर्ग-एक आणि वर्ग-दोन व तिचे संवर्ग.**

५) पाटबंधारे आणि वीज विभाग आणि इमारती व दळणवळण विभाग यामधील महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा ही वर्ग-एक आणि वर्ग-दोनची मिळून बनलेली असेल आणि तीचे पुढील संवर्ग असतील व त्यांच्या वेतनश्रेणी त्यांच्या समोर स्वतंत्रपणे दर्शवल्या आहेत.

| | वर्ग-एक | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १) | मुख्य अभियंते | रु.१८००-१००-२००० |
| २) | अधीक्षक अभियंते | रु. १३००-६०-१६०० |
| ३) | कार्यकारी अभियंते | रु.६५०-(६ वर्षे)-४५-११००-५०-१२०० |

| | | |
|---|---|---|
| ४) | सहाय्यक अभियंते वर्ग-एक | रु.४१०-३०-६५०-रोध-४५-१०१० (परीवीक्षा काळात नियत वेतन रु. ३८०/- |

| | **वर्ग-दोन** | **वेतनश्रेणी** |
|---|---|---|
| १) | उप अभियंते | रु.३२५-३०-६२५-रोध-३०-९२५ |
| २) | सहाय्यक अभियंते वर्ग-दोन | रु.३२५-३०-६२५-रोध-३०-९२५ (परीवीक्षा काळात नियत वेतन रु.३२५/- |
| ३) | उपविभागीय अभियंते | रु.३२५-२५-५५०-३०-६१०-रोध-३०-९१० |
| ४) | उपविभागीय अधिकारी | रु.३२५-२५-५५०-३०-६१०-रोध-३०-८८० |

६) जे अधिकारी वर्ग-एक व वर्ग-दोन या संवर्गापैकी कोणत्याही एका संवर्गातील एखाद्या पदावर कायम झाले असतील किंवा त्या पदावर त्यांना धारणाधिकार असेल ते अधिकारी अनुक्रमे, महाराष्ट्र अभियंता सेवावर्ग-एक आणि महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा वर्ग-दोन चे सदस्य असतील. वर्ग-एक किंवा वर्ग-दोन च्या संवर्गापैकी कोणत्याही संवर्गातील एखाद्या पदावर ज्यांचा असा धारणधिकार नसेल परंतू, अशा एखाद्या पदावर ते स्थापनापन्न असतील असे अधिकारी अनुक्रमे, महाराष्ट्र अभियंता सेवा वर्ग-एक किंवा महाराष्ट्र अभियंता सेवावर्ग दोन चे तात्पुरते सदस्य असतील.

**(तीन) वर्ग-एक व वर्ग-दोन ची थेट भरती परिवीक्षा आणि प्रशिक्षण**

७) (अ) सदर नियम ज्या तारखेपासून लागू करण्यात आले आहेत त्या तारखेस जे अधिकारी सहाय्यक अभियंता वर्ग-एक मध्ये स्थायी झाले होते किंवा परीवीक्षधीन होते त्या सर्व अधिकाऱ्यांना सहाय्यक अभियंता वर्ग-एक असे संबोधण्यात येईल.

(ब) यापुढे सहाय्यक अभियंता वर्ग-एक व वर्ग-दोनच्या संवर्गातील सर्व उमेदवारांची नियुक्ती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून स्पर्धात्मक परीक्षा घेऊन भाग निर्देशाव्दारे करण्यांत येईल.

८) महाराष्ट्र अभियंता सेवा वर्ग-एक म्हणजेच सहाय्यक अभियंता वर्ग-एक आणि महाराष्ट्र अभियंता सेवा वर्ग-दोन म्हणजेच सहाय्यक अभियंता वर्ग-दोन यांच्या नेमणूका महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घ्यावयाच्या स्पर्धात्मक परीक्षांच्या आधारे नामनिर्देशन करुन करण्यात येतील. दोन्ही सेवांसाठी म्हणेज वर्ग-एक व वर्ग-दोन या दोहोंची लेखी परीक्षा आणि मौखिक परीक्षा या समान असतील या स्पर्धात्मक परीक्षे बाबतचे नियम या निर्णयाच्या परिशिष्ट-एक मध्ये विहित करण्यात आले आहेत.

९) उमेदवारास परीक्षेच्या प्रवेशास पात्र होण्यासाठी खालील गोष्टी आवश्यक आहेत.-

(एक) आयोगाकडून विहित करण्यात येईल त्या तारखेला उमेदवाराचे वय २१ वर्षे पूर्ण असावे परंतू २५ पूर्ण केलेले नसावे. (मागास वर्गीय उमेदवाराच्या वयाबाबत वय वर्षे ३०)

(दोन) संविधीमान्य विद्यापीठाची बी.ई (स्थापत्य) पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली समतुल्य पदवी धारण केलेली असावी.

१०) या नियमांच्या अन्य उपबंधांना अधीन राहून तसेच, मागासवर्गाच्या उमेदवारांत कोणत्याही आरक्षणांना अधीन राहून महाराष्ट्र अभियंता सेवा वर्ग-एक व वर्ग-दोन यांतील उपलब्ध पदांवरील नियुक्त्या आयोगाने तयार केलेल्या पात्र उमेदवारांच्या याद्या मधून करण्यात येतील. महाराष्ट्र अभियंता सेवा वर्ग-एक व वर्ग-दोन मधील रिक्त पदे वरील निर्दिष्ट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या मागासवर्गाच्या उमेदवारांमधून त्या त्या वर्गासाठी असलेल्या क्रमानुसार आणि अशा नेमणूकांसाठी योग्य मानल्या गेलेल्या उमेदवारांच्या नेमणूकीव्दारे भरण्यात येतील.

स्पर्धा परीक्षेव्दारे निवडले गेलेले उमेदवार तत्सम वैद्यकिय चाचणीत त्या आधीच पास झलेले असल्याखेरीज अन्यथा वैद्यकिय मंडळाने त्या उमेदवारांस शारीरीक आणि वैध्दिकदृष्ट्या नियुक्तीस योग्य असल्याचे प्रमाणित केल्याशिवाय त्यांना महाराष्ट्र अभियंता सेवेच्या वर्ग-एक किंवा यथा स्थिती वर्ग-दोन साठी नियुक्त केले जाणार नाही.

११) नामनिर्देशाव्दारे संवर्गापैकी कोणत्याही संवर्गात नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवाराचा परीवीक्षा कालावधी दोन वर्षाचा असेल. त्यांना प्रथमतः प्रशिक्षणार्थी म्हणून सेवा करावी लागेल. हा प्रशिक्षणाचा कालावधी प्रत्येक प्रकरणात शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल. सुरुवातीला विनिर्दिष्ट केलेला हा प्रशिक्षणचा कालावधी एक वर्षाहून अधिक असता कामा नये आणि त्या कालावधीत त्यांना उपविभागाचा कार्यभार देण्यात येणार नाही. उमेदवारांने केलेल्या कामाच्या टिप्पणांवरुन आणि ज्या अधिकाऱ्याच्या हाताखाली त्याला प्रशिक्षण दिले जात असेल त्या अधिकाऱ्याकडील अहवालावरुन दिसून येणारी कामगिरी असमैंधकारक असल्याचे आणि आवश्यक त्या दर्जाचे नसल्याचे दिसून येत असेल तर अशा उमेद्वारांचा प्रशिक्षण कालावधी शासन वाढवू शकेल. प्रशिक्षण समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर उमेद्वारास परीवीक्षाध्यीन अभियंता म्हणून एका वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी उपविभागचा कार्यभार दिला जाईल. आणि हा कालावधी शासनाकडून वाढविण्यात आल्याखेरीज अन्यथा, ज्या अधिकाऱ्यांच्या

हाताखाली उमेद्वाराने काम केले असते त्या अधिकाऱ्याकडून अनुकूल अहवाल देण्यात आला असेल तर, आणि नामनिर्देशनाव्दारे कामावर रुजू झाल्यापासून त्याने एकूण दोन वर्षाची सेवा पूर्ण केली असेत तर त्याला महाराष्ट्र अभियंता सेवेतील सहाय्यक अभियंता वर्ग-एक किंवा यथास्थिती वर्ग-दोन या संवर्गातील त्याच्या नेमणूकीप्रमाणे स्थायी केले जाईल. प्रशिक्षण कालावधीत उमेदवार त्यांनी पाहिलेल्या व केलेल्या कामा संबंधीच्या टिप्पण्या ठेवतील आणि ज्यांच्या हाताखाली त्यांना प्रशिक्षणासाठी ठेवण्यात आले असेल त्या अधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे सादर करतील. प्रशिक्षणाची जबाबदारी असणारे अधिकारी, उमेदवारांच्या कामाचे सर्व साधारण मूल्यमापन करण्याच्या दृष्टीने, या टिप्पण्यांची छाननी करतील.

परीवीक्षा कालावधीतील प्रतिकूल अहवालामुळे ज्या उमेदवारांना, नामनिर्देशाव्दारे सेवेत रुजू झाल्यापासून एकूण तीन वर्षाच्या कालावधीत सेवेत कायम करण्यात आले नसेल त्या उमेदवारांना कामावरुन कमी केले जाण्याचा संभव आहे.

**(चार) वर्ग-दोन मध्ये पदोन्नतीने नेमणूका**

१२) (अ) उप अभियंतांच्या संवर्गात पुढील व्यक्तींचा समावेश असेल :-

(एक) या नियमांच्या प्रारंभीच्या तारखेपर्यत उप अभियंता पदावर प्रत्यक्ष काम करीत असलेले किंवा त्या पदाचा धारणधिकार असलेले सर्व अधिकारी.

(दोन) या नियमांच्या प्रारंभीच्या तारखेपयैत उप अभियंत्याच्या स्थायी पदावर परीवीक्षेवर थेट भरती करण्यात आलेले सर्व थेट सेवा प्रविष्ट आणि

(तीन) दिनांक ३०/४/१९६० रोजी उप अभियंता म्हणून स्थानापन्न असलेले सर्व अधिकारी

(ब) वरील तीन प्रवर्गाखाली येणाऱ्या अधिकाऱ्याकरीता आवश्यक असल्याप्रमाणे उप अभियंत्यांची अनेक पदे उप अभियंत्यांच्या संवर्गासाठी असलेल्या या नियमांच्या प्रारंभी वेगळी ठेवण्यात येतील. तथापि, या संवर्गात भावी काळात कोणत्याही नवीन नेमणूका केल्या जाणार नाहीत आणि उप अभियंत्याच्या बढतीमुळे वेळोवेळी निर्माण होणारी स्थायी रिक्त पदे इतर तीन संवर्गात स्थायी पदांची विभागणी करण्यासाठी जे प्रमाण निर्धारीत करण्यात आले आहे त्याच प्रमाणानुसार बदली करण्यात येतील.

(क) उप अभियंता संवर्गातील पदे वेगळी ठेवून उरलेल्या वर्ग-दोन ची पदे आणि वर्ग-दोन मध्ये कोणत्याही वेळी अस्तित्वात असलेली सर्व अस्थायी पदे खालील प्रमाणात तीन संवर्गात विभागण्यात येती :-

| | | स्थायी पदे | अस्थायी पदे |
|---|---|---|---|
| २) | सहाय्यक अभियंते वर्ग-दोन | ३४% | काही नाही |
| ३) | उपविभागीय अभियंते | ३३% | ५०% |
| ४) | उपविभागीय अधिकारी | ३३% | ५०% |

(ड) नियम १२(क) मध्ये दर्शविलेले वर्ग-दोन मधील स्थायी आणि अस्थायी पदांचे तीन संवर्गात विभागणी करण्याचे प्रमाण ३ वर्षे अंमलात असेल आणि त्यानंतर त्याचा आढावा घेण्यात येईल

१३) (अ) या नियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास ३०/४/१९६० नंतरच्या दिनांकापासून अधिकारी उप अभियंत्यांच्या पूर्वीच्या संवर्गात उप अभियंता म्हणून स्थानापन्न झालेले असतील त्या अधिकाऱ्यांना, जर (एक) तेस्तातक असतील तर उपविभागीय अभियंते म्हणून आणि (दोन) स्नातक नसतील तर उपविभागीय अधिकारी म्हणून या नियमांच्या प्रारंभाच्या दिनांकापासून त्यांची नियुक्ती झाली असल्याचे समजण्यात येईल.

(ब) पोट नियम (अ) मध्ये अंतर्भूत असलेल्या अधिकाऱ्यांची उप अभियंता म्हणून केलेली सेवा, सर्व प्रयोजनाकरीता, त्यांच्या नवीन संवर्गात केलेली सेवा समजण्यात येईल.

(ड ) खालील नियम १४ च्या अधीन राहून उपविभागीय अभियंत्याच्या संवर्गातील सर्व नेमणूका अभियंत्यांच्या दुय्यम सेवेतील स्नातक कनिष्ठ अभियंत्यामधून बढलीव्दारे करण्यात येईल.

(ड) खालील नियम १४ ब च्या अधीन राहून उपविभागीय अधिकाऱ्यांच्या संवर्गातील सर्व नेमणूका दुय्यम अभियंता सेवेतील खालील प्रवर्गातून बढतीव्दारे करण्यात येतील.

(एक) पदविका मिळवलेले अवेक्षक

(दोन) उच्च दुय्यम प्रमाणपत्रे धारण करणारे अवेक्षक.

१४) (अ) नियम १३,१५ आणि १७ याच्या अधीन राहून जिल्हा परिषदेखालील जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-तीन (अभियांत्रिकी) चे स्थानापन्न उपविभागीय अभियंत्याच्या किंवा यथास्थिती उपविभागीय अधिकाऱ्यांच्या संवर्गात बढती मिळण्यास पात्र ठरतील. मात्र, त्यांच्या बढत्या पाटबंधारे व वीज विभाग खालील उपविभागीय अभियंत्याची ९ अस्थायी पदे आणि उपविभागीय अधिकाऱ्यांची ९ अस्थायी पदे आणि इमारती व दळणवळण विभागातील उप विभागीय अभियंत्याची ३५ अस्थायी पदे व उपविभागीय अधिकाऱ्यांची ३४ अस्थायी पदे या पुरती मर्यादित राहतील, ही पदे त्या संवर्गामध्ये त्यांच्यासाठी राखीव ठेवण्यात यावीत.

(ब) जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांच्यासाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांचा आढावा प्रत्येकी दोन वर्षांनी घेण्यात यावा.

(क) जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांमध्ये अर्हताप्राप्त उमेदवार उपलब्ध नसतील तर जिल्हा परिषदांमधून अर्हताप्राप्त व्यक्ती बढतीसाठी उपलब्ध होईपर्यंत संबंधित विभागातील अर्हताप्राप्त कनिष्ठ अभियंते किंवा यथास्थिती अवेक्षक यांच्यामधून राखीव पदापैकी रिक्त असलेली पदे भरता येतील.

१५) स्थानापन्न उपविभागीय अभियंता म्हणून बढती मिळण्यास पात्र होण्यासाठी दुय्यम अभियंता सेवेतील कनिष्ठ अभियंता किंवा जिल्हा परिषदाखालील जिल्हा तांत्रिक सेवावर्ग-तीन (अभियांत्रिकी) मधील स्नातकाने कमीत कमी तीन वर्षाची सेवा पूर्ण केलेली असणे आवश्यक असेल.

१६) (अ) उपविभागीय अभियंत्याच्या पदावरील बढत्या पाटबंधारे व वीज विभाग आणि इमारती व दळणवळण विभाग यांनी स्वतंत्रपणे ठेवलेल्या कनिष्ठ अभियंत्याच्या राज्यव्यापी ज्येष्ठता सूचीतून निवड करुन देण्यात येतील.

(ब) त्याचप्रमाणे जिल्हा परिषदांमधील जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग-तीन (अभियांत्रिकी) यातील बढत्या ग्रामविकास विभागाने ठेवलेल्या स्नातकांच्या राज्यव्यापी ज्येष्ठता सूचीतून निवड करुन देण्यात येतील.

१७) स्थानापन्न उपविभागीय अधिकारी म्हणून बढती मिळण्यास पात्र होण्यासाठी खली दर्शविल्याप्रमाणे कमीत कमी सेवा असली पाहिजे.

(अ) पदविकाधारक अवेक्षक ८ वर्षे

(ब) उच्च दुय्यम प्रमाणपत्र धारण करणारे अवेक्षक १० वर्षे

१८) उपविभागीय अधिकाऱ्यांच्या संवर्गातील बढत्या पाटबंधारे आणि वीज विभाग आणि इमारती व दळणवळण विभाग यांनी स्वतंत्ररित्या ठेवलेल्या अवेक्षकांच्या राज्यव्यापी ज्येष्ठता सूच्यांमधील निवडीव्दारे करुन देण्यात येतील.

१९) जिल्हा परिषदाखालील जिल्हा तांत्रिक सेवावर्ग-तीन (अभियांत्रिकी) यामधील उपविभागीय अधिकाऱ्यांच्या संवर्गातील बढत्या देखील ग्राम विकास विभागाने ठेवलेल्या राज्यव्यापी ज्येष्ठता सूच्यांमधून निवड करुन देण्यात येतील.

२०) उपविभागीय अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या अवेक्षकांच्या निवड सूच्या तयार करण्यासाठी पदविका धारकांना, उच्च दुय्यम प्रमाणपत्र धारकापेक्षा दोन वर्षाची विशेष सवलत देऊन सर्व स्नातके तर व्यक्तींची स्वतंत्र श्रेणीवार ज्येष्ठतासूची तयार करण्यात येईल. अवेक्षकांच्या प्रत्येक गटातील परस्पर ज्येष्ठता राज्यव्यापी निवड सूचीप्रमाणे असेल.

२१) १ एप्रिल, १९७४ पासून पुढे उपविभागीय अभियंता किंवा उाविभागीय अधिकारी म्हणून मिळालेली पदोन्नती व्यावसायिक परीक्षा पास होण्यापासून त्याला सुट किंवा मुदतवाढ देण्यात आली असल्याखेरीज अन्यथा, ती परीक्षा पास होण्याच्या अधीन असेल.

२२) उपविभागीय अभियंता आणि उपविभागीय अधिकारी या पदांवरील बढत्या वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार, पाटबंधरे आणि वीज विभाग आणि इमारती व दळणवळण विभागी यांनी तयार केलेल्या निवड सूच्यांच्या आधारे देण्यात येतील.

२३) स्थानापन्न उपविभागीय अभियंते आणि उपविभागीय अधिकारी यांनी स्थानापन्न क्षमतेत ३ वर्षाची समाधानकारक सेवा पूर्ण केल्यानंतर कायम केले जाण्यास पात्र ठरतील.

**<u>(पाच) कार्यकारी अभियंता म्हणून पदोन्नती आणि स्थायी करण.</u>**

२४) कार्यकारी अभियंत्यांची (स्थायी आणि अस्थायी) सर्व पदे (एक) वर्ग-एक मधील म्हणजेच सहाय्यक अभियंता वर्ग-एक मधील थेट सेवा प्रविष्ट आणि (दोन) वर्ग-दोन मधील चार संवर्गातील अधिकारी म्हणजेच उप अभियंते, सहाय्यक अभियंते वर्ग-दोन, उपविभागीय अभियंते आणि उपविभागीय अधिकारी यांच्या वर्ग दोन मधील चार संवर्गातील अधिकारी म्हणजेच उप अभियंते/सहायक अभियंते वर्ग दोन, उपविभागीय अभियंते आणि उपविभागीय अधिकारी यांच्या मधून वर्ग-एक च्या थेट सेवा प्रविष्ठाकीरता ४० टक्के आणि वर्ग-दोन मधून पदोन्नतीसाठी ६०टक्के याप्रमाणे भरण्यात येतील.

२५) सर्व अभियंत्यांना (जे अंतिमतः पदोन्नतीस अपात्र ठरवले गेले असतली ते वगळून) बढती देण्यात आल्यानंतर वर्ग-दोन मधून येणाऱ्या पदोन्नतांसाठी उपलब्ध असलेली कार्यकारी अभियंत्यांची ६० टक्के पदे खालील प्रमाणात बढती देऊन भरण्यात येतील :-

(एक) वर्ग-दोन मधील थेट सेवा प्रविष्टांमधून बढती देऊन २५ टक्के.

(दोन) वर्ग-दोन मधील स्नातक पदोन्नतांमधून बढती देऊन २५ टक्के.

(तीन) वर्ग-दोन मधील स्नातकेतर पदोन्नतांमधून स्थानापन्न बढती देऊन १० टक्के.

२६) नियम २४ प्रमाणे निश्चित केलेली प्रमाणे तीन वर्षे अंमलात राहतील आणि त्यानंतर त्यांचा पुन्हा आढावा घेण्यात येईल.

२७) स्थानापन्न बढत्या देताना देखिल शक्यतोवर ही प्रमाणे पाळली जातील. ही प्रमाणे कोणत्याही विश्ष्टि वर्षातील स्थायी किंवा अस्थायी पदांना लागू होतील असे नाही ही पदे शक्यतोवर कार्यकारी अभियंत्यांच्या (स्थायी आणि अस्थायी) संपूर्ण संवर्गातील एकूण पदसंख्येच्या संदर्भात विविध प्रवर्गासाठी निश्चित केलेल्या एकूण प्रमाणानुसार भरण्यात येतील.

२८) स्थानापन्न कार्यकारी अभियंता म्हणून पदोन्नती मिळण्यास पात्र ठरण्यासाठी खाली दर्शविल्याप्रमाणे किमान सेवा पूर्ण करणे आवश्यक असेल :-

| | |
|---|---|
| (एक) सहाय्यक अभियंते वर्ग-एक | ४ वर्षे |
| (दोन) उप अभियंते, सहाय्यक अभियंते | वर्ग दोन मधील सेवा |

| | |
|---|---|
| वर्ग-दोन आणि उपविभागीय अभियंते | ७ वर्षे |
| (तीन) उपविभागीय अधिकारी | वर्ग दोन मधील सेवा १० वर्षे. |

२९) पदोन्नतीसाठी असलेली वरील पात्रता विहित व्यावसायिक परीक्षा पास होण्यापासून त्या अधिकाऱ्याला सुट किंवा मदतवाढ देण्यात आली असल्याखेरीज अन्यथा, ती परीक्षा पास होण्याच्या अधीन असेल.

३०) कार्यकारी अभियंत्याच्या पदांवरील बढत्या वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार, पाटबंधारे आणि वीज विभाग आणि इमारती व दळणवळण विभाग, यांनी तयार केलेल्या निवड सूच्यांच्या आधारे देण्यात येतील.

३१) (अ) कार्यकारी अभियंता म्हणून कायम होण्यास पात्र ठरण्यासाठी खाली दर्शविल्याप्रमाणे कमीत कमी सेवा असणे आवश्यक असेल :-

| | |
|---|---|
| (एक) सहायक अभियंता वर्ग-एक | ६ वर्षे |
| (दोन) उप अभियंता, सहायक अभियंता वर्ग-दोन आणि उपविभागीय अभियंता | वर्ग-एक व वर्ग-दोन एकूण सेवा १० वर्षे |
| (तीन) उपविभागीय अधिकारी | वर्ग-एक व दोन मधील एकूण सेवा १३ वर्षे. |

(ब) स्थानापन्न कार्यकारी अभियंता म्हणून दोन वर्षाची समाधानकारक सेवा पूर्ण केल्या खेरीज कोणत्याही अधिकाऱ्याला कार्यकारी अभियंता म्हणून कायम केले जाणार नाही.

३२) सदर नियमांच्या प्रारंभापूर्वी नियुक्त करण्यात आलेल्या वर्ग-एक च्या सहायक अभियंत्याला शासनाने हा कालावधी वाढवून दिला असल्या खेरीज अन्यथा, नऊ वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या काळात कायम करण्यात येईल.

**(सहा) ज्येष्ठता**

३३) वर्ग-एक आणि वर्ग-दोन यामधील प्रत्येक संवर्गातील ज्येष्ठता सूचीचे दोन भाग असतील म्हणजेच स्थायीकरण झालेल्या अधिकाऱ्यांचा भाग "अ" आणि ज्यांचे स्थायीकरण झालेले नसेल अशा अधिकाऱ्यांचा भाग "ब".

(अ) स्थायीकरणाच्या वर्षानुसार भाग "अ" मध्ये नांवे क्रमवार लावण्यात येतील.

(ब) संवर्गातील स्थायी अधिकाऱ्यांना त्या त्या संवर्गातील अस्थायी अधिकाऱ्यापेक्षा ज्येष्ठ समजण्यात येईल.

(क) कोणत्याही संवर्गाच्या ज्येष्ठता सूचीच्या भाग "ब" मध्ये ज्या बाबतीत स्थानापन्न क्षमतेतील बढत्या या पूर्णपणे अस्थायी किंवा स्थानिक व्यवस्था म्हणून देण्यात आली असेल अशी प्रकरणे खेरीज करुन अन्यथा अखंड स्थानापन्नतेचा दिनांक विचारात घेऊन नावांचा क्रम लावण्यात येईल.

३४) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-तीन) अभियांत्रिकी या मधून उपविभागीय अभियंते/उपविभागीय अधिकारी म्हणुन पदोन्नती मिळाल्यानंतर त्यांच्या बढतीच्या तारखा विचारात घेऊन त्यांची ज्येष्ठता पाटबंधारे आणि वीज विभाग/इमारती व दळणवळण विभाग यामधील अधिकाऱ्यांबरोबर निश्चित करण्यात येईल.

३५) वर्ग-एक व वर्ग-दोन या दोहोतील थेट सेवा प्रविष्टांच्या बाबतीत, जेथे उमेदवाराने त्याला नेमणूकीवर रुजू होण्यासाठी निर्धारीत केलेल्या कालावधीमध्ये रुजू केली असेल त्या बाबी व्यतिरिक्त अन्यथा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने त्यांनी दिलेली स्थाने विचारात घेऊन त्यांची ज्येष्ठता निश्चित केली जाईल.

३६) कार्यकारी अभियंत्याच्या ज्येष्ठता सूचीच्या भाग "अ" मध्ये स्थायीकरणाच्या वर्षा अन्वये नांवे क्रमवार लावण्यात येतील. स्थायीकरण हे थेट सेवा प्रविष्ट व पदोन्नत यांच्या मधून निशित प्रमाणानुसार करण्यात येणार असल्यामुळे खालील नियम ३७ च्या अधीन राहून, कायम केलेल्या कार्यकारी अभियंत्यांची सूची स्थायी सेवेच्या कालावधीच्या आधारे तयार करण्यात येईल.

३७) (अ) स्थायी कार्यकारी अभियंत्याच्या यादीमध्ये एखाद्या विशिष्ट वर्षात कायम करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची नांवे पुढीलप्रमाणे लावण्यात येतील.

(एक) सहायक अभियंता वर्ग-एक मधील पदोन्नत व्यक्ती एकत्रितपणे.

(दोन) उप अभियंत्यामधील पदोन्नत व्यक्ती एक त्रितपणे.

(तीन) सहाय्यक अभियंते वर्ग-दोन मधील पदोन्नत व्यक्ती एकत्रितपणे.

(चार) उपविभागीय अभियंत्यामधील पदोन्नत व्यक्ती एकत्रितपणे.

(पाच) उपविभागीय अधिकाऱ्यांमधील पदोन्नत व्यक्ती एकत्रितपणे.

(ब) स्थायी उप-अभियंत्याच्या सूचीमध्ये एखाद्या विशिष्ट वर्षात स्थायीकरण झालेल्या अधिकाऱ्यांची नांवे खालील क्रमानुसार लावण्यात येतील :-

(एक) वर्ग-दोन मधील थेट सेवा प्रविष्ट व्यक्ती एकत्रितपणे.

(दोन) वर्ग-दोन मधील पदोन्नत व्यक्ती एकत्रितपणे.

३८) (अ) नियम ३७ ला अपवाद म्हणून आणि थेट सेवा प्रविष्ट किंवा पदोन्नत या पैकी कोणाच्याही अडचणी निवारण करण्यासाठी अवलंबलेला विशेष उपाय म्हणून, या थेट सेवा प्रवेश व बढत्या यांच्या प्रमाणामध्ये फेरफार केल्यामुळे किंवा या नियमाव्दारे घालण्यात आलेल्या किमान सेवेच्या आवश्यकतामुळे निर्माण होणाऱ्या अनुशेष रिक्त पदावर करावयाचे कार्यकारी अभियंते व उप अभियंते या दोन्ही संवर्गातील स्थायीकरण, संपूर्ण संवर्गातील निश्चित केलेली प्रमाणे लक्षात घेऊन करण्यात येतील. परंतू अशा प्रकारे स्थायीकरण, केलेल्या अधिकाऱ्यांची नांवे शक्यतोवर थेट सेवा प्रविष्ट आणि पदोन्नत व्यक्ती मध्ये १:१ प्रमाणात फिरवून रिक्त पदांवर क्रमवार लावण्यात येतील.

(ब) ह्या नियमानुसार स्थायीकरण झालेले अधिकारी त्यांच्या स्थायीकरणाच्या क्रमानुसार त्यांना देण्यात येईल तो परस्पर ज्येष्ठता धारण करतील.

(क) हा नियम फक्त ३० जून, १९७१ पर्यंतच प्रवर्तनात असेल.

**(सात) पदोन्नती आणि स्थायीकरण या बाबतची तत्वे.**

३९) स्थानापन्न पदोन्नती आणि स्थायीकरणे ही योग्यतेस अधीन राहून ज्येष्ठतेव्दारे नियंत्रित करण्यात येतील. तसेच या नियमातील विविध प्रवर्गाकरीता निश्चित केलेली एकूण प्रमाणे व किमान सेवा आवश्यक्ता यांच्याही ती अधीन असतील.

४०) नियम प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणात देण्यात आलेल्या किंवा सेवेच्या किमान नियम गरजांचे उल्लंघन करुन देण्यात आलेल्या सर्व स्थानापन्न बढत्या अनपेक्षित समजण्यात येतील आणि त्या क्षमतेत केलेली सेवा ज्येष्ठतेसाठी धरली जाणार नाही.

**(आठ) अडचणी दूर करणे.**

४१) महाराष्ट्र राज्य अभियांत्रिकी सेवा वर्ग-एक व वर्ग-दोन मध्ये नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींच्या सेवेच्या शर्तीचे नियमन करण्याच्या कोणत्याही पूर्वगामी आलेल्या नियमाच्या प्रवर्तनामुळे एखाद्या विशिष्ट प्रकरणात अनुचित अडचणी निर्माण होत असल्यास राज्य शासनाची खात्री पटली असेल अशा बाबतीत शासन एखाद्या प्रकरणावर योग्य आणि समन्वयी रीतीने कार्यवाही करण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशा मर्यादेपर्यंत आणि आवश्यक वाटेल अशा अपवादास आणि शर्तीस अधीन राहून त्या नियमाव्दारे आवश्यक असलेली गोष्ट काढून टाकू शके ल किंवा शिथिल करु शकेल.

४२) वित्त विभागाचे अर्धशासकीय पत्र क्र. पीसीआर-१८७०/सव्वीस, दिनांक ९ आक्टोबर, १९७० अन्वये वित्त विभागाच्या सहमतीने आणि इमारती व दळणवळण विभाग आणि सामान्य प्रशासन विभाग यांच्या सहमतीने सदर आदेश काढण्यात येत आहे.

४३) महाराष्ट्र नागरी सेवा वर्गीकरण अणि सेवा प्रवेश नियमांमध्ये आवश्यक ती दुरुस्ती चिठ्ठी प्रसिध्द करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागास विनंती करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
**(बी.ए.कुलकर्णी)**
शासनाचे सचिव, महराष्ट्र शासन.